
# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

Scanned by CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

Scanned by CamScanner



# छत्रपती शिवाजी महाराज यांचे 'आरमार'विषयक धोरण - आज्ञापत्रकृत

- प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे
अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे
मोबाइल-८४८४०३६७५०, ई-मेल-radhakisanmuthe05@gmail.com

मध्ययुगीन कालखंडातील रामचंद्रपंत अमात्यकृत मराठेशाहीतील राजनीती अर्थात 'आज्ञापत्र' या ग्रंथामध्ये आरमार या प्रकरणात छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमारविषयक धोरण यासंदर्भात माहिती दिली आहे. त्यातून त्यांची आरमारविषयक दूरदृष्टी स्पष्ट होते व आताच्या कालखंडातसुद्धा देशाच्या, राज्याच्या संरक्षणासाठी आरमार व्यवस्था कशी सक्षम असली पाहिजे हे राज्यकर्त्यांना सूचित करते; परंतु मध्ययुगीन कालखंडात आरमाराचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांनी जाणले आणि आपल्या स्वराज्यात प्रथम आरमार स्थापन केले. विशेषतः भारतीय आरमाराचा जनक म्हणून त्यांना ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांनी गड, कोट, दुर्ग, सैन्य व आरमार यांना अधिक महत्त्व दिले; कारण संरक्षणाच्या दृष्टीने या घटकांना अधिक महत्त्व होते, असा दूरदृष्टी असलेले राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्र' या ग्रंथात महाराजांचा आरमारविषयक दृष्टिकोन व धोरण यासंदर्भात अत्यंत मौलिक अशी मांडणी केली आहे, तसेच छ. शिवाजी महाराज एक राज्यकर्ते, राजा म्हणून आपल्या स्वराज्याचा रक्षणासाठी भविष्यात समुद्रातील किल्ले व समुद्र यावर ज्यांना सत्ता स्थापन करता येईल तो राजा आपले राज्य राखू शकेल याची जाणीव महाराजांना होती; कारण त्या कालखंडात, फिरंगी, यवन, इंग्रज यांच्यापासून समुद्रमार्गे स्वराज्यास धोका आहे, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे छ. शिवाजी महाराजांनी आरमार उभारणीसाठी आपली योजना आखली. त्या अनुषंगाने रामचंद्रपंत अमात्य यांनी आपल्या आज्ञापत्र ग्रंथात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आरमारविषयक विचार, धोरण व महाराजांचे राजनीतीविषयक धोरण यासंदर्भात आपले विचार मांडले आहेत.

**आरमार –**

जगाच्या इतिहासात नोंद व्हावी इतके असामान्य नेतृत्व व कर्तृत्व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ठिकाणी होते. त्यामुळे त्या कालखंडात आरमार उभारणे छ. शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे द्योतक म्हणता येईल. मध्ययुगात त्यांनी आरमाराचे महत्त्व ओळखले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आरमाराच्या बळावर तत्कालीन कालखंडात शत्रूपक्ष इंग्रज आणि पोर्तुगिजांना नियंत्रणात ठेवले होते. महाराजांच्या या कार्याचे यथार्थ चित्रण सभासदाच्या बखरीमध्येसुद्धा आलेले आहे. आरमाराची बांधणी व सुसज्जता या अनुषंगाने रामचंद्रपंत अमात्य यांनी 'आज्ञापत्र' या ग्रंथात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आरमारविषयक धोरण, विचार यांचा अतिशय सखोल अशी मांडणी केलेली दिसते. ते म्हणतात, आरमार हे एक स्वतंत्र राज्यांगच आहे. ज्याप्रमाणे ज्याचे अश्वबल त्याची सर्व प्रजा असते, त्याप्रमाणेच ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. यासाठी राजाकडे आरमाराची सिद्धता असली पाहिजे, असे विधान आरमार प्रकरणाच्या सुरुवातीला येते. यावरून आपणास छ. शिवाजी महाराज यांच्या आरमारविषयक दूरदृष्टी व धोरण या बाबतीत रामचंद्रपंत अमात्य आपल्या ग्रंथात उल्लेख करतात. त्याचबरोबर आरमाराची बांधणी कशी असावी आणि आरमार सुसज्ज कसे ठेवावे, याबाबतचा विचारही आज्ञापत्रात येतो. तो असा - जहाज, चालीचा गुराबा म्हणजे वापरात असलेले जहाज फार मोठे किंवा फार लहान नसावे तर ते मध्यम आकाराचे करून

सजवावे. याठिकाणी गुराबा या शब्दाबरोबर गलबत, जहाज असा शब्द रामचंद्रपंत, आज्ञापत्रकार वापरताना दिसतात. मोठे व्यापारी गलबते, फरगात म्हणजे मोठी लढाऊ जहाजे जी वाऱ्याशिवाय हालू शकत नाहीत, ती उपयोगाची नाहीत. अशा गलबतावर लढवय्या शिपाई, तोफा, दारूगोळा, बंदुका, सुरुंग इत्यादी साहित्य आरमाराला आवश्यक सज्ज ठेवावे. यातून आज्ञापत्रकार यांनी शिवाजी महाराजांच्या आरमारविषयक धोरणासंदर्भात अत्यंत समर्पक मांडणी केलेली दिसते. आरमार व्यवस्था कशी असावी किंवा करावी यासंदर्भात शिवाजी महाराजांचे धोरण आज्ञापत्रकार मांडतात की, आरमारचे वेगवेगळे सुभे (सरदार) करावेत. प्रत्येक सुभ्यात पाच गुराबे व पंधरा गलबते असावीत. त्यांच्यावर एक सरसुभा (मुख्य सरदार) असावा व त्याच्या आज्ञेत सर्वांनी राहावे, तसेच आरमारावरील सैनिकांचा पगार मुलकात म्हणजे जो वसूल येतो त्यातून द्यावा. जकातांचे उत्पन्न (पैदास्तीवरील) नेमणूक करू नये. पैदास्तीवरील नेमणूक केल्यास सावकारी (व्यापारी) बुडून जाईल, सावकारी वाढवावी. कारण सावकारीमुळे जकातीचे उत्पन्न वाढेल. आरमारावरील सैनिकांनी समुद्रात संचार करून शत्रूला जवळ येऊ देऊ नये. जलदुर्गासाठी लागणारे साहित्य व दारुगोळा वरचेवर पोहोचेल अशी व्यवस्था करावी. दर्यावर्दी शत्रूंच्या समाचाराला सज्ज राहून शत्रूचा प्रदेश जिंकावा. शत्रूच्या प्रदेशातील बातम्या गुप्तहेराकडून जमा करून शत्रूच्या प्रदेशातून निघून यावे. अशाप्रकारे छ. शिवाजी महाराजांनी आरमार बांधणीसाठी कशाप्रकारे धोरण राबिवले, याचा परामर्श या ग्रंथात अमात्य घेताना दिसतात.

**व्यापारी जहाजासंबंधीचे धोरण -**

आज्ञापत्रात अमात्यांनी छत्रपतींच्या आरमारविषयक धोरणाच्या अनुषंगाने उल्लेख करताना म्हटले आहे, समुद्रात सरकारी परवाना घेऊन संचार करणाऱ्या व्यापारी जहाजांना दळणवळणाची मुभा द्यावी, असे आज्ञापत्रात नमूद केले आहे. यातून शिवाजी महाराजांची व्यापाराला उत्तेजन देण्याची दृष्टी प्रत्ययला येते. याबाबत आज्ञापत्रात आणखी सखोलपणे विवेचन येते. ते म्हणजे परवानाधारक सावकाराच्या वाट्याला जाऊ नये, तसेच परवानाधारक सावकारांना उपद्रव होत असेल, तर त्याचा बंदोबस्त करावा, त्याचे निवारण करावे, तर शत्रूच्या मुलखातील सावकारी जहाजे जर आपल्या परिसरात आली तर ती पकडून बंदरात आणावीत. सर्व माल जप्त करावा आणि राजाच्या आज्ञेनुसार त्यांच्याविषयी वर्तन करावे. यावरून छत्रपती शिवाजी महाराजांची आपल्या व परक्या मुलखातील सावकारी जहाजांबद्दलची स्पष्ट भूमिका समजून येते, तसेच इंग्रज, पोर्तुगीज यांना शिवाजी महाराजांच्या आरमाराचा किती धाक वाटत असेल, याचीही कल्पना येते. आरमारासंदर्भात छ. शिवाजी महाराजांचे धोरण आज्ञापत्रमधून अमात्यांनी अत्यंत स्पष्टपणे मांडलेले दिसते, तसेच या ग्रंथात आरमारी युद्ध व आरमारी छावणी या अनुषंगाने छत्रपतींचे धोरण अथवा भूमिका रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्र ग्रंथातून मांडताना त्यांनी शिवाजी महाराजांची आरमाराबद्दलची नीती स्पष्ट केली आहे. ती अशी - आपल्या आरमाराची शत्रूच्या आरमाराबरोबर गाठ पडली आणि युद्ध सुरू झाले, तर सर्वांनी एकत्र येऊन कस्त करून शत्रूशी झुंजावे. आपले गलबत वाऱ्यावर चालत नाही असे वाटले तर काहीही करून शत्रूच्या तावडीत न सापडता आपल्या जंजिऱ्याच्या (जलदुर्ग) आश्रयाला यावे. आपल्या तरांड्याला (गलबत) अपाय होऊ देऊ नये, आपले संरक्षण करून शत्रू जिंकावा शत्रू दमगीर झाला (दमला) अथवा शरण आला, तर तोफांचा मारा करत दुरूनच त्याच्या शरणागतीला मान्यता द्यावी, तसेच आरमाराची छावणी दर्याला उधाण येण्याच्या अगोदर पंधरा दिवस अगोदर करावी. तीसुद्धा एका बंदरात अथवा जलदुर्गाजवळ किंवा उघड्या ठिकाणी करू नये. प्रत्येक वर्षी एकाच बंदरात त्याच्याकडून आगी लावल्या जातील किंवा धोका होऊ शकतो. या प्रत्येक वर्षात नवीन बंदरात छावणी करावी. शत्रू सहजासहजी पोहोचणार नाही याची काळजी घ्यावी. सर्व आरमार एका जागी न ठेवता अंतराने छावणी करावी. रात्री गस्त घालावी. आरमाराच्या अधिकाऱ्यांनी आपले कुटुंब दोन महिने घरीच ठेवून आरमाराची रात्रंदिवस चाकरी करावी. आरमारास बरेच लाकूड लागते. अशा वेळी राज्यातील लाकूड राजाच्या परवानगीने तोडावे. आंबा, फणस ही झाडे यास हात लावू नये. जीर्ण झाली असतील तरच उपयोगात आणावीत. प्रजेने ही झाडे लेकराप्रमाणे वाढवलेली असतात. या विचारातून छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण बाबतीतील नैतिक



Scanned by CamScanner

भूमिका लक्षात येते. एकूणच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजनीतीमध्ये आरमाराचे स्थान हे किती मौलिक होते ते आपणास आज्ञापत्र या ग्रंथात रामचंद्रपंत अमात्य यांनी आरमार प्रकरणाच्या अनुषंगाने अत्यंत सखोलपणे मांडलेले दिसून येते, तसेच छत्रपती शिवाजी महाराज राजनीती व युद्धनीतील एक द्रष्टा राजा होता, हे अधोरेखित केले आहे. त्याचबरोबर 'आज्ञापत्र' रामचंद्रपंतलिखित ग्रंथ शिवाजी महाराजांच्या राजनीतीपर कौशल्यावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरतो, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ -**


१. 'आज्ञापत्र' - रामचंद्रपंत अमात्य

२. 'आज्ञापत्र' - संपादक - डॉ. प्र. न. देशपांडे, प्रथम आवृत्ती - २००५, स्नेहवर्धन प्रकाशन डॉ. विजया देशपांडे

३. 'छत्रपती शिवाजी महाराज' - कृष्णराव अर्जुन केळूसकर - सरस्वती पब्लिशिंग कंपनी, आवृत्ती, जानेवारी २०१८


◆◆◆◆◆

